# कार्यकारी सारांश

# कार्यकारी सारांश

*शहरी भागातील कचरा व्यवस्थापन हे आज आपला देश सामोरे जात असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे. झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणामुळे ही परिस्थिती बिकट झाली आहे. ढिसाळ कचरा व्यवस्थापन हे न केवळ हरितगृह वायुंचे उत्सर्जन, पाणी आणि मातीचे प्रदूषण अशा अनेक पर्यावरणीय समस्यांना कारणीभूत होते, तर प्राणीसंक्रमित आणि जलसंक्रमित रोगांना सुद्धा कारणीभूत होते. शिवाय, अयोग्य कचरा व्यवस्थापनाचे सामाजिक परिणाम आहेत, विशेषत: अयोग्य कचरा व्यवस्थापनामुळे या कामामध्ये गुंतलेले व थेट प्रभावित होणारे कर्मचारी. अयोग्य कचरा व्यवस्थापनाचा पर्यावरण तसेच लोकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्यामुळे कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन हे प्रमुख क्षेत्र आहे ज्याच्याकडे प्रभावीपणे लक्ष देणे गरजेचे आहे.*

*2021-22 पर्यंत अद्ययावत केलेले 2016-17 ते 2020-21 या कालावधीचे (i) कचरा व्यवस्थापनाचे धोरण आणि नियोजन हे निर्माण होणाऱ्या कचऱ्याशी सुसंगत आणि प्रचलित कायदेशीर चौकटीशी सुसंगत होते किंवा कसे, (ii) नागरी स्थानिक संस्थांद्वारे कचरा व्यवस्थापन सुविधांचे संचालन आणि देखभाल आर्थिकदृष्टया शाश्वत होते किंवा कसे, (iii) कचरा व्यवस्थापनासाठी नगरपालिकेने केलेली कामे कार्यक्षम व परिणामकारक होती किंवा कसे, आणि (iv) कचरा व्यवस्थापनातील संनियंत्रण यंत्रणा पर्याप्त आणि प्रभावी होती किंवा कसे ह्या मुद्द्यांचे निर्धारण करण्यासाठी संपादणूक लेखापरीक्षण केले होते. यामध्ये नगर विकास विभाग, नगरपालिका प्रशासन संचालनालय, संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि चाचणी-तपासणी केलेल्या 45 नागरी स्थानिक संस्थांच्या अभिलेख्यांच्या तपासणीचा समावेश होता.*

*कचऱ्याचे उगमस्थानी वर्गीकरण करणे, एकल वापर प्लॅस्टिकच्या विक्री आणि वापरावर बंदी घालणे, कचरा टाकल्यास दंड आकारणे यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय व आदेश जारी केले होते. तथापि, घनकचरा व्यवस्थापन नियमावलीत नमूद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाने राज्याचे धोरण आणि रणनीती तयार केली नाही. चाचणी-तपासणी केलेल्या सर्व नागरी स्थानिक संस्थांनी कचऱ्याचे संकलन, वाहतूक आणि कचऱ्यावर प्रक्रिया/विल्हेवाट या बाबी समाविष्ट असलेले पाच वर्षांसाठीचे (अल्पमुदत) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केले होते, तर चाचणी-तपासणी केलेल्या 30 नागरी स्थानिक संस्थांनी सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये दीर्घमुदत आराखडे तयार केले होते. सविस्तर प्रकल्प अहवालांमध्ये नियोजित कचरा निर्माण आणि प्रक्रिया क्षमतेचे चुकीचे अंदाज अशा त्रुटी होत्या. चाचणी-तपासणी केलेल्या 12 नागरी स्थानिक संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन सेवांसाठी वापरकर्ता शुल्क आकारले नाही. चाचणी-तपासणी केलेल्या 33 नागरी स्थानिक संस्थांनी भारत सरकारने सेवा स्तर निकषांमध्ये नेमून दिलेले घनकचरा शुल्क संकलनातील 90 टक्के कार्यक्षमतेचे उद्दिष्ट गाठले नाही.*

*लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, 12 नागरी स्थानिक संस्थांनी वाहन तोलकाटे स्थापित केले नव्हते आणि म्हणून, कचरा संकलन करण्यासाठी नेमलेल्या वाहनांच्या आकारमानात्मक (व्हॉल्यूमेट्रिक) क्षमतेवर किंवा कचऱ्याच्या अंदाजाच्या आधारावर प्रमाण मोजले जात होते. चाचणी-तपासणी केलेल्या 29 नागरी स्थानिक संस्थांनी घरगुती स्तरावरील कचरा संकलनाचे सेवा स्तर निकष साध्य केले नव्हते. चाचणी-तपासणी केलेल्या 28 नागरी स्थानिक संस्थांमध्ये कचरावेचकांच्या बचत गटांची स्थापना केली नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या 21 नागरी स्थानिक संस्थांनी कचऱ्याचे 100 टक्के विलगीकरण केले होते. तर, चाचणी-तपासणी केलेल्या 23 नागरी स्थानिक संस्था कचऱ्याचे उगमस्थानी 100 टक्के विलगीकरणाचे सेवा स्तर निकष साध्य करू शकल्या नाहीत, एका नागरी स्थानिक संस्थेने काहीही वर्गीकरण केले नाही. 2021-22 दरम्यान चाचणी-तपासणी केलेल्या 24 नागरी स्थानिक संस्थांनी संकलित केलेला ई-कचरा महापालिका घनकचऱ्याबरोबर मिसळलेला होता. चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्था वर्ष 2021-22 दरम्यान घराघरामध्ये नगरपालिका कचऱ्याबरोबर मिसळला गेलेला जैव-वैद्यकीय कचरा संकलित करत होत्या. 2016-17 ते 2021-22 दरम्यान संकलित केलेल्या एकूण कचऱ्याच्या 38 टक्के कचरा विना-प्रक्रिया पडून राहिला. 2018-19 ते 2021-22 दरम्यान नागरी स्थानिक संस्थांमध्ये निर्माण झालेला 98 टक्के बांधकाम व पाडकाम कचरा विनाप्रक्रिया राहिला. चाचणी-तपासणी केलेल्या 16 नागरी स्थानिक संस्थांनी सामग्री पुन:प्राप्ती सुविधा/दुय्यम साठवणूक सुविधा उभारली नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या 26 नागरी स्थानिक संस्थांनी सॅनिटरी भरावभूमी विकसित केल्या नव्हत्या. सॅनिटरी भरावभूमीच्या विकासाच्या अभावामुळे 2016-17 ते 2021-22 दरम्यान 26 नागरी स्थानिक संस्थांद्वारे निर्मित 33.88 लाख मेट्रिक टन कचरा उघड्या क्षेपणभूमीवर टाकला जात होता. चाचणी-तपासणी केलेल्या 13 नागरी स्थानिक संस्थांनी जैव-खनिकर्म आणि जैव-उपाय किंवा खुल्या क्षेपणभूमींचे शास्त्रीय आच्छादन यासाठी नियोजन केले नव्हते. घनकचरा व्यवस्थापनामध्ये सहभागी कामगारांना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे वितरीत न केलेल्या नागरी स्थानिक संस्थांची संख्या लक्षणीय होती ज्यामुळे त्या कामगारांना विविध संसर्गजन्य व हवेतून पसरणाऱ्या रोगांना सामोरे जावे लागेल. तथापि, गेल्या वर्षीच्या तुलनेत वैयक्तिक सुरक्षा उपकरणे वितरीत न केलेल्या नागरी स्थानिक संस्थांच्या संख्येत 2021-22 मध्ये घटता कल दिसला.*

*चाचणी-तपासणी केलेल्या 45 नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला 2016-17 ते 2019-20 दरम्यान सादर करावयाच्या 180 वार्षिक अहवालांपैकी 31 वार्षिक अहवाल (17 टक्के) सादर केले नव्हते. चाचणी-तपासणी केलेल्या एकाही नागरी स्थानिक संस्थेने प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियमांतर्गत वार्षिक अहवाल नगर विकास विभागाकडे सादर केले नव्हते. घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत नियमांच्या अंमलबजावणीसंबंधीच्या बाबी, घनकचरा व्यवस्थापनेवरील राज्याचे धोरण व रणनीती यांचा आढावा घेण्यासाठी स्थापित केलेल्या राज्य स्तरीय सल्लागार समितीमध्ये 22 पैकी 12 सभासद नव्हते.*

*नवी मुंबई महानगरपालिका आणि मलकापूर नगरपरिषदेने अवलंबिलेल्या चांगल्या पद्धतींवरही या अहवालात प्रकाश टाकण्यात आला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घेऊन राबविलेल्या जुने बूट/साड्या/टाकाऊ सामान यांचे संकलन करून कलाकृती बनवणे, पर्यावरणस्नेही पिशव्या बनवणे आणि जुन्या बुटांचे नूतनीकरण करणे यांसारख्या उपक्रमांमुळे भरावभूमीकडे जाणाऱ्या कचऱ्यात घट झाली. मलकापूर नगरपरिषदेने वीज निर्मितीसाठी बायोगॅस प्रकल्पाच्या माध्यमातून हॉटेलच्या विलगीकृत ओल्या कचऱ्याचा वापर केला. या पद्धतीमुळे कंपोस्ट प्रकल्प चालविण्यासाठी बाह्य ऊर्जेचा शून्य वापर झाला.*

***शिफारसी:***

1. ***शासनाने कमीत कमी कचरा निर्माण होण्यावर लक्ष केंद्रीत करून घनकचरा व्यवस्थापनाकरिता एक सर्वसमावेशक धोरण आणि रणनीती तयार करावी.***
2. ***शासनाने घनकचरा व्यवस्थापनाच्या नियोजनात सर्वंकष सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश नागरी स्थानिक संस्थांना द्यावे.***
3. ***शासनाने नागरी स्थानिक संस्थांना घनकचरा व्यवस्थापन सेवांवर वापरकर्ता शुल्क आकारण्यासाठी निर्देश द्यावे.***
4. ***शासनाने नागरी स्थानिक संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन शुल्क संकलनातील सुमार कार्यसिद्धीचा आढावा घ्यावा व त्याच्या सुधारणेसाठी पावले उचलावी.***
5. ***राज्य शासनाने सुनिश्चित करावे की नागरी स्थानिक संस्था घनकचऱ्याचे वजन करण्यासाठी वाहन तोलकाटे स्थापित करतील.***
6. ***राज्य शासनाने कचरा वेचकांचे बचत गट स्थापन करण्यासाठी आणि घनकचरा व्यवस्थापनात त्यांच्या सहभागास प्रोत्साहन देण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांना सक्रिय पावले उचलण्याचे निर्देश द्यावेत.***
7. ***शासनाने नागरी स्थानिक संस्थांना जाहिरात व जागरूकता अभियानाद्वारे कचऱ्याचे विलगीकरण करण्यावर जास्त भर देण्याचे आणि कचरा विलगीकरण करण्यास प्रोत्साहन देण्याचे निर्देश द्यावेत. तसेच, संकलित जैव-वैद्यकीय कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीसाठी सामायिक जैव-वैद्यकीय कचरा उपचार सुविधेबरोबर व्यवस्थेची सुनिश्चिती करावी.***
8. ***शासनाने, नागरी स्थानिक संस्थांनी कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया सुविधा निर्मिती करणे व संवर्धन करणे आणि सामग्री पुन:प्राप्ती/दुय्यम साठवणूक सुविधा नियत कालावधीत उभारण्याचे निर्देश द्यावे.***
9. ***शासनाने नागरी स्थानिक संस्थांना कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी सॅनिटरी भरावभूमी विकसित करण्याचे निर्देश द्यावे.***

10. *नागरी स्थानिक संस्थांनी कचरा हाताळणाऱ्या कामगारांना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे पुरविली जात आहेत आणि त्यांचा वापर होत आहे याची सुनिश्चिती करावी.*

11. *शासनाने सुनिश्चित करावे की घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत स्थापना करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सल्लागार मंडळामध्ये, नियमामध्ये प्रस्तावित केल्यानुसार पर्याप्त प्रतिनिधित्व केलेले आहे.*